महाराष्ट्र शासन

# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण पालघर, जिल्हा पालघर यांचे कार्यालय

पार्श्वनाथ ९ इमारत, बिडको नाका,
नवली, ता.पालघर, जिल्हा-पालघर

दुरध्वनी क्रमांक ०२५२५-२५३१११
Email ID : rdc.palghar-mh@gov.in

---

**वाचले :**

१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
२) साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, नवीन मंत्रालय मुंबई यांचेकडील करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेली अधिसूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४/०३/२०२०.
४) या कार्यालयाचे आदेश क्र.जि.आ.व्य.पालघर/कोरोना विषाणू/IncidentComt/dy.co/आदेश-५१३/२० दि.१०/०४/२०२०.
५) या कार्यालयाचे आदेश क्र.जि.आ.व्य.पालघर/को.वि./Incident Commander आदेश/कावि-७३८/२०, दि.१९/०४/२०२०
६) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेकडील आदेश क्र. DMU/२०२०/CR.९२/DisM-१ दि.१४/१०/२०२०
७) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेकडील आदेश क्र. DMU/२०२०/CR.९२/DisM-१ दि.२७/११/२०२०
८) या कार्यालयाची मंजूर टिपणी दि.०४/१२/२०२०.

---

क्र/जि.आ.व्य.पालघर/को.वि./लग्न समारंभ परवानगी आदेश/कावि- १६१४ /२० दि.०४/१२/२०२०

**आ दे श :**

ज्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोविड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च, २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. सदर शासन अधिसूचनेच्या नियम १० नुसार जिल्हाधिकारी पालघर यांना पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड-१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

आणि ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यामधील पोटकलम २ (अ) नूसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

आणि ज्याअर्थी, उपोद्घातातील अ.क्र.०५ अन्वये राज्य शासनाने दिनांक १४/१०/२०२० रोजी अधिसूचना निर्गमित केली असून सदर अधिसूचनेमधील परिच्छेद क्र.३ मधील मार्गदर्शक तत्वानूसार लग्न समारंभाकरीता पाहूण्यांची संख्या ५० पेक्षा जास्त राहणार नाही असे निर्देश दिलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, उपोद्घातातील अ.क्र.५ च्या आदेशान्वये सबंधित उपविभागासाठी तहसीलदार व कार्यकारी दंडाधिकारी यांना Incident Commander म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

त्याअर्थी मी, **डॉ माणिक गुरसळ, जिल्हाधिकारी पालघर** मला आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ व महाराष्ट्र कोव्हिड १९ उपाययोजना नियम, २०२० चा नियम १० नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये पालघर जिल्हयातील तहसीलदार व कार्यकारी दंडाधिकारी तथा Incident Commander यांना त्यांचे कार्यक्षेत्रामध्ये (वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्र वगळून) उपोद्घातातील अ.क्र. ०६ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार तसेच शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या आदेशानूसार **लग्न समारंभास परवानगी देण्याबाबत अधिकार या आदेशान्वये प्रत्यायोजित करीत आहे.**

सदरचा आदेश हे या कार्यालयाच्या पुढील आदेशापर्यंत अंमलात राहतील.

उक्त आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी. सदरहू आदेशाची अंमलबजावणी करण्यास संबंधितांनी टाळाटाळ केल्यास संबंधितांचे विरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील ५१(b), भारतीय दंड संहिता (४५ ऑफ १८६०) च्या कलम १८८ व साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७ नुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदरहू आदेश आज दिनांक ०४/१२/२०२० रोजी माझे सही व शिक्यानिशी दिला आहे.

**सही/-xxx**
(डॉ माणिक गुरसळ)
**जिल्हाधिकारी पालघर तथा**
**अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन**
**प्राधिकरण, पालघर**

**प्रत :**

१) सर्व सबंधितास
२) मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषीत.
४) आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका, विरार यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषीत.
५) पोलीस अधीक्षक पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषीत.
६) उपविभागीय दंडाधिकारी (सर्व) यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
७) तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी (सर्व) यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
८) जिल्हा माहिती अधिकारी पालघर यांना माहिती व प्रसिध्दीकरीता.

**(डॉ. किरण महाजन)**
**निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य**
**कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती**
**व्यवस्थापन प्राधिकरण, पालघर**

**(स्थळ प्रतीवर मा.जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी असे)**